महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १२१ वे | दिनांक : २६/०४/२०२६ | वार रविवार

## भोंदू मनोहर भोसलेचे मुख्यमंत्र्यांसोबत फोटो : नितीन गडकरी अन् नाना पटोलेंसोबतही फोटो








**सोलापूर** : व्यवसायात भरभराटीचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी तुरुंगाची हवा खाणाऱ्या भोंदू मनोहर भोसले याची न्यायालयाने ३ दिवसांच्या पोलिस कोठडीत रवानगी केली आहे. यामुळे स्वतःला बाळूमामाचा अवतार समजणाऱ्या या भोंदूचा पाय खोलात गेल्याचा दावा केला जात आहे. दरम्यान, मनोहर भोसलेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व काँग्रेस नेते नाना पटोले यांच्यासोबतचे फोटो व्हायरल झालेत. त्यामुळे त्याची मोठ-मोठ्या लोकांसोबत उठबस होती हे स्पष्ट झाले आहे.

सोलापूर पोलिसांनी शुक्रवारी एका प्रकरणात सोलापूरच्या कुर्डुवाडी येथून भोंदू मनोहर भोसले व त्याचा सहकारी विशाल वाघमारे या दोघांना अटक केली. त्यानंतर आज त्यांना माढा दिवाणी व फौजदारी न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपींच्यावतीने वकील सुभाष हल्याळकर यांनी युक्तिवाद केला. तर सरकारी पक्षातर्फे प्रदिपसिंह राजपूत यांनी बाजू मांडली. यावेळी झालेल्या संक्षिप्त सुनावणीत बचाव पक्षाने आपल्या अशिलांची अटक बेकायदा असल्याचा दावा केला. गुन्ह्यातील कलमे पाहता पोलिसांनी त्यांना नोटीस देऊन अटक करण्याची गरज होती, पण पोलिसांनी तसे न करता त्यांना थेट अटक केली, याकडे त्यांनी अंगुलीनिर्देश केला.

त्यांच्या या युक्तिवादावर सरकारी वकिलांनी जोरदार आक्षेप घेतला. मनोहर भोसले हा एक सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे पुढील तपासासाठी त्याची पोलिस कोठडी हवी आहे, असे ते म्हणाले. अखेर न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मनोहर भोसले व विशाल वाघमारे या दोघांना प्रत्येकी ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

दुसरीकडे, भोंदू मनोहर भोसलेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचा एक फोटो व्हायरल झाला आहे. तो या फोटोत एका सोफ्यावर बसून मुख्यमंत्र्यांशी संवाद साधताना दिसून येत आहे. हा फोटो केव्हाचा आहे व कुठला आहे? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण या फोटोची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा होत आहे. मनोहर भोसलेचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबतचाही एक फोटो व्हायरल झाला आहे. या फोटोत गडकरी भोसलेला हात जोडताना दिसून येत आहेत. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नीही दिसून येत आहेत. भोसलेच्या या फोटोचीही राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.दरम्यान, मनोहर भोसलेचा काँग्रेस नेते नाना पटोले यांच्यासोबतचाही एक फोटो व्हायरल झाला आहे. या फोटोत भोसले हा नाना पटोलेंचा नारळ देऊन सत्कार करताना दिसून येत आहे. हा फोटोही केव्हाचा आहे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण या तिन्ही फोटोंमुळे भोंदू मनोहर भोसलेची राजकारण्यांसोबत असणारी उठबस अधोरेखित झाली आहे.

## उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसणार?



**मुंबई** : राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर येत असून, विधानसभा निवडणुकीतील महायुतीच्या विजयानंतर आणि महाविकास आघाडीच्या दारूण पराभवानंतर शिवसेना ठाकरे गटातील गळतीचे सत्र अद्यापही थांबलेले नाही. निवडणुकीपासून अनेक दिग्गज नेत्यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडलेली असतानाच, आता पक्षाला आणखी एक मोठा धक्का बसण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. शिवसेनेतील एक बडा नेता पक्ष सोडणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

'मातोश्री'वर आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीला परभणीचे खासदार संजय जाधव यांनी गैरहजेरी लावल्यामुळे त्यांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चांना आता अधिक उधाण आले आहे. त्यामुळे ऑपरेशन टायगरची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. उद्धव ठाकरे यांनी परभणी लोकसभा मतदारसंघाची बैठक बोलावली होती. या बैठकीला अंबादास दानवे, मिलिंद नार्वेकर, परभणीचे आमदार राहुल पाटील उपस्थित होते.

दरम्यान, खासदार संजय जाधव यांनी कौटुंबिक कारणास्तव बैठकीला उपस्थित राहू शकलो नसल्याचे स्पष्टीकरण दिले असले तरी, प्रत्यक्षात ते आपल्या मतदारसंघातील कार्यक्रमांमध्ये सक्रिय दिसत असल्याने त्यांच्या भूमिकेबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी मार्च महिन्यात उद्धव ठाकरेंनी बोलावलेल्या महत्त्वाच्या बैठकीलाही जाधव यांनी दांडी मारली होती आणि आता पुन्हा एकदा त्यांच्यासह परभणीचे जिल्हाप्रमुख गंगाप्रसाद अहिरराव व चार तालुकाप्रमुखांनी बैठकीला अनुपस्थित राहणे पक्षांतराच्या चर्चेला बळ देणारे ठरत आहे.

तसेच चार दिवसांपूर्वीच परभणीच्या विश्रामगृहात झालेल्या बैठकीत संजय जाधव यांनी आपली अस्वस्थता शिवसैनिकांसमोर बोलून दाखवली होती, त्यामुळे या सलग अनुपस्थितीमुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाल्या आहेत.

## यापुढे बाबासाहेबांचे नाव कधीही घेऊ नका:माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांना श्याम मानव यांचा सल्ला



**नागपूर** : भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी काही दिवसांपूर्वी मध्यप्रदेश येथील छातरपूर जिल्ह्यातील बागेश्वर धामला सहकुटुंब भेट दिली होती. तसेच त्यांनी धीरेंद्र शास्त्री यांच्यासोबत अर्धा तास चर्चा देखील केल्याची माहिती समोर आली होती. तसेच या भेटीचे फोटो देखील सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यावरून भूषण गवई यांच्यावर टीका होताना दिसत आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष श्याम मानव यांनी पत्रकार परिषद घेत गवई यांच्यावर टीका केली आहे.

माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी आता यापुढे बाबासाहेबांचे नाव घ्यायचे नाही, असा सल्ला श्याम मानव यांनी दिला आहे. तसेच ते म्हणाले, बबहुशान गवई धीरेंद्र शास्त्री महाराजांच्या पाया पडायला गेले होते याचा मला प्रचंड शॉक बसलाय. भूषण गवई म्हणतात की मी आंबेडकरी विचारांचा आहे. आंबेडकरी विचारांचे मी दूध प्यायला आहे, पण तो माणूस जर धीरेंद्र शास्त्री महाराजांच्या पाया पडून आशीर्वाद घेत असेल तर आता तुम्ही यापुढे आंबेडकरांचे नाव कधीही घ्यायचे नाही. तो अधिकार तुम्ही गमावलेला आहे, असे मानव म्हणाले.

पुढे बोलताना श्याम मानव म्हणाले, भूषण गवई हे रा.सू. गवई यांचे सुपुत्र आहेत. यापूर्वी विक्तू बाबांचा सत्कार दीक्षाभूमीवर घेतला त्यावेळेस मी विरोध केला होता. धीरेंद्र शास्त्री यांनी अनेकवेळा वादग्रस्त वक्तव्य केली आहेत. कालच त्यांनी नागपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या बद्दल वादग्रस्त वक्तव्य केले आहे.

दरम्यान, नागपूर येथे बोलताना धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. महाराज युद्ध करून थकले आणि त्यांनी स्वामी समर्थ चरणी आपले राज्यपाट देऊ केले असे विधान त्यांनी केले होते. आधीच भूषण गवई यांच्या भेटीने वादात सापडलेले शास्त्री आता पुन्हा नवीन वादात सापडले आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ एप्रिल २०२६


## मानवता हाच खरा धर्म; मुरूम येथे मानव एकता दिन संपन्न






**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** माणसाने माणसाला जोडणे हीच काळाची गरज आहे. द्वेषाच्या आगीत होरपळणाऱ्या जगाला प्रेमाची फुंकर घालण्यासाठी मानवतावादी दृष्टिकोन अंगीकारणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन बार्शी येथील विक्रम क्षीरसागर यांनी केले.सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या आशीर्वादाने, संत निरंकारी मंडळाच्या वतीने शुक्रवार, २४ एप्रिल रोजी मुरूम येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या सभागृहात मानव एकता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी क्षीरसागर मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.बलिदानाचा इतिहास आणि मानवतेचा संदेशआपल्या ओघवत्या शैलीत मार्गदर्शन करताना क्षीरसागर म्हणाले की, २४ एप्रिल १९८० रोजी बाबा गुरबचनसिंहजी महाराज यांनी मानवतेच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्यासोबतच भक्त चाचा प्रतापसिंह आणि भाई बुटासिंह यांचे बलिदान विसरता येणार नाही. हे बलिदान केवळ एका संस्थेसाठी नसून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी होते. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ जगभरात हा दिवस मानव एकता दिन म्हणून पाळला जातो.बाबा हरदेवसिंहजी महाराजांचे कार्य रक्तदान नव्हे, जीवनदानसद्गुरू बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी ३६ वर्षे मिशनचे नेतृत्व करताना मानवतेला केंद्रबिंदू मानले. त्यांनी दिलेला रक्त नाड्यांमध्ये वहावे, नाल्यांमध्ये नको, हा संदेश आज जगभर रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरवला जात आहे. आध्यात्मिक जागृतीसोबतच वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि आपत्ती निवारण अशा सामाजिक कार्यात मिशनने जागतिक ठसा उमटवला असल्याचेही त्यांनी नमूद केले.सेवादारांसाठी आदर्शाची त्रिसूत्री सांगताना अहंकाराचा त्याग, मी पणा सोडून तू (ईश्वर) चा स्वीकार करणे. बाबाजींनी दिलेले पाच प्रण केवळ बोलण्यासाठी नसून ते प्रत्यक्ष जगण्यासाठी आहेत. सेवा, सिमरण आणि सत्संग या त्रिसूत्रीचा अवलंब करून जीवनात नम्रता आणणे.या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश समाजातील जाती-धर्म आणि भेद विसरून सर्वांना एका सूत्रात बांधणे हा होता, असे मुरूम ब्रँचचे मुखी दयानंद साखरे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

कार्यक्रमाचे नेटके संचालन मीरा मोटे यांनी केले.याप्रसंगी मुरूम व परिसरातील बहुसंख्य सेवादल सदस्य, महात्मा आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. स्थानिक निरंकारी मंडळाच्या सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## अधिकारी होण्याचे स्वप्न भंगले! : भीषण अपघातात १८ वर्षीय तरुणी ठार






**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील चित्तेपिंपळगाव येथे धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर एक भीषण अपघात घडला आहे. मागून येणाऱ्या भरधाव ट्रकने दुचाकीला जोराची धडक दिल्याने १८ वर्षीय तरुणीचा जागीच मृत्यू झाला, तर तिचे वडील या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. मृत तरुणीचे 'मोठी अधिकारी' होण्याचे स्वप्न या अपघातामुळे कायमचे अधुरे राहिले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खोडेगाव (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील रहिवासी प्रतीक्षा गणेश ढगे (वय १८) आणि तिचे वडील गणेश ढगे हे आपल्या दुचाकीने (क्र. एम.एच.२० बी.डब्ल्यू.३१००) संभाजीनगरकडे जात होते. चित्तेपिंपळगाव जवळ आले असता, पाठीमागून येणाऱ्या ट्रकने (क्र. आर.जे.३२ जी.डी.७४३९) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे वडील गणेश ढगे बाजूला फेकले गेल्याने गंभीर जखमी झाले. मात्र, प्रतीक्षा ट्रकच्या पुढच्या टायरमध्ये अडकली आणि ट्रकने तिला सुमारे २५० फुटांपर्यंत फरफटत नेले. या अत्यंत भीषण घटनेत प्रतीक्षाचा जागीच मृत्यू झाला.

प्रतीक्षा ही अभ्यासात अत्यंत हुशार होती. तिने नुकतीच ११ वीची परीक्षा दिली होती आणि सीईटी (CET) परीक्षेच्या तयारीसाठी ती वडिलांसोबत संभाजीनगरला जात होती. शिक्षण पूर्ण करून मोठी अधिकारी व्हायचे आहे, अशी तिची जिद्द होती. मात्र, काळाने तिच्यावर झडप घातल्याने एका गुणवंत विद्यार्थिनीचा अंत झाला. तिच्या पश्चात आई, वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे.अपघाताची माहिती मिळताच चिकलठाणा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रविकिरण दरवडे, दीपक देशमुख, गणेश कोरडे आणि बीट जमादार सचिन ढवळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे पाठवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बीट जमादार सचिन ढवळे करत आहेत.

स्थानिक आणि शैक्षणिक क्षेत्रातून दुःख व्यक्त पिंपळगाव पांढरी येथील माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक युसुफ बागवान यांनी शोक व्यक्त करताना सांगितले की, "प्रतीक्षा आमच्या विद्यालयातील अत्यंत हुशार विद्यार्थिनी होती, तिच्या मृत्यूची बातमी ऐकून मन व्यथित झाले आहे." तसेच, पंचायत समिती सदस्य शैलेश चौधरी यांनी आवाहन केले की, "धुळे-सोलापूर महामार्गावरील झाल्टा फाटा, आडगाव फाटा, भालगाव फाटा, निपाणी फाटा या ठिकाणी वाहनधारकांनी आणि पादचाऱ्यांनी रस्ता ओलांडताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे."

वाहनधारकांना महत्त्वाच्या सूचना चिकलठाणा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रविकिरण दरवडे यांनी या निमित्ताने दुचाकीधारकांना सावध केले आहे. ते म्हणाले की, "ज्या ठिकाणी उड्डाणपूल आहेत, तिथे जड वाहने भरधाव वेगाने धावत असतात. अशा ठिकाणी अपघाताचा धोका टाळण्यासाठी दुचाकीधारकांनी सर्व्हिस रोडचा वापर करावा. तसेच आपल्या दुचाकीला दोन्ही बाजूंनी आरसे लावावेत, जेणेकरून मागून येणारे वाहन स्पष्ट दिसेल आणि स्वतःचा बचाव करता येईल."

## छत्रपती संभाजीनगरात जागतिक हिवताप दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका मलेरिया विभाग आणि जिल्हा हिवताप कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 25 एप्रिल 2026 रोजी जागतिक हिवताप दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महानगरपालिकेचे महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ आणि आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार, तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या दिनानिमित्त क्रांती चौकातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून जनजागृती रॅली काढण्यात आली. सहाय्यक संचालक (मलेरिया) डॉ. रेखा भंडारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. हिवतापाबाबत माहिती, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि प्रबोधनात्मक घोषणा देत ही रॅली क्रांती चौक, सिल्लेखाना, समर्थनगर मार्गे सिद्धार्थ उद्यानापर्यंत काढण्यात आली. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. आर.बी. ढोले, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे, जिल्हा हत्तीरोग अधिकारी डॉ. वैशाली पाटील आणि महानगरपालिका जीवशास्त्रज्ञ (प्र.) डॉ. सय्यद सुमय्या यांची प्रमुख उपस्थिती होती.

सिद्धार्थ उद्यानात हिवतापाचे प्रदर्शन भरवण्यात आले होते, ज्याचे उद्घाटन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या हस्ते झाले. यावर्षीचे घोषवाक्य 'हिवताप दुरीकरणासाठी कटीबद्ध: आता हे शक्य आहे. आता हे केलेच पाहिजे' असे होते. डॉ. पारस मंडलेचा आणि डॉ. आर.बी. ढोले यांनी निरोगी आरोग्यासाठी डास प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवण्याचे आवाहन केले.

नागरिकांनी आपले घर आणि परिसर स्वच्छ ठेवावा, डास उत्पत्तीची ठिकाणे नष्ट करावीत, दर आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळावा आणि हिवताप प्रतिज्ञेतील संदेश घरोघरी पोहोचवावा, असे आवाहन डॉ. पारस मंडलेचा यांनी केले. प्रदर्शनात डासांचे विविध प्रकार, गप्पी मासे आणि डासांच्या जीवनचक्राची माहिती देण्यात आली, तसेच हस्तपत्रिकांचे वाटप करण्यात आले.

यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आणि हिवतापाबाबत प्रतिज्ञा घेण्यात आली. महानगरपालिकेचे व जिल्हा हिवताप कार्यालयाचे सर्व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी, कीटकसमूहनाशक, मलेरिया झोनल पर्यवेक्षक आणि फवारणी कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जीवशास्त्रज्ञ (प्र.) डॉ. सय्यद सुमय्या, डॉ. आदित्यकुमार जोशी, शेख दानिश, मिलिंद जबंगी, डिंगबर कोथळकर, मनिषा ठाकरे, आशिष पाटील, निखिल ठाकरे, मलेरिया पर्यवेक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ एप्रिल २०२६


## चहा

सर्वांचा आवडता
मी म्हणजे चहा
चव माझी गोड
घेऊन तर पहा

लहान मोठ्यांचा
प्रिय मी भारी
पोटात गेल्यावर
येते तरतरी

पाहुणे येता घरी
होते माझी तयारी
गुणगाण गातात
पाहुणे मंडळी सारी

न होणारी कामं
होतात माझ्यामुळे
अनोळखी माणसासंगे
मैत्रीचे नाते जुळे

कप आणि बशी
माझे जवळचे दोस्त
घोट घेत सर्व म्हणतात
चहा झाला मस्त



- रविंद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## घरचा कर्ता पुरुष

घरचा कर्ता पुरुष ,
कुटुंबासाठी राबतो.
कितीही आले दु:ख,
तरी उरामध्ये दाबतो. १

दु:ख झाले तरी,
रडता येत नाही.
पुरुष म्हणून दु:ख,
सदा पचवत राही. २

संकटांशी लढा मात्र,
हिंमतीने देत असतो.
दु:ख झाले तरी कधी,
बाजार मांडत नसतो. ३

सर्वांसाठी घरात,
दु:ख सहन करतो.
सर्वांच्या आयुष्यात,
सदा सप्तरंग भरतो. ४

दु:खात सर्वात पुढे,
सुखात दूर राहतो.
कुटुंबाचे सुख सदा,
दूर बसून पाहतो. ५



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर.

## केंद्रीय विद्यालयाच्या विभागीय हँडबॉल स्पर्धेत नागपूर संघांचे वर्चस्व



**नाशिक रोड :** शहरातील तोफखाना केंद्र परिसरातील पीएम श्री केंद्रीय विद्यालय क्रमांक १, नाशिक रोड कॅम्प येथे मुंबई विभागीय स्तरावरील हँडबॉल स्पर्धा २० ते २४ एप्रिल दरम्यान उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत विविध केंद्रीय विद्यालयांच्या संघांनी मोठ्या तयारीने सहभाग घेतला. बक्षीस वितरण समारंभ शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजराज मीना हे होते. यावेळी प्राचार्य मीना म्हणाले, "हँडबॉल हा केवळ खेळ नसून सांघिक भावना, शिस्त, वेग आणि निर्णयक्षमता शिकवणारा खेळ आहे. विद्यार्थ्यांनी मैदानावर दाखवलेला उत्साह व खेळाडूवृत्ती कौतुकास्पद आहे." त्यांनी विजेत्या संघांचे अभिनंदन करताना पराभूत संघांच्या प्रयत्नांचेही कौतुक केले. "पराभव हा शेवट नसून यशाची नवी सुरुवात असते," असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर खेळालाही महत्त्व देण्याचे आवाहन केले. खेळामुळे शरीर व मन सुदृढ होते. मैदानावरील सांघिक भावना आयुष्यातही जपावी, असे आवाहन करुन प्राचार्य मीना यांनी विद्यार्थ्यांना "जिंकत राहा, खेळत राहा आणि मोठी स्वप्ने पहा" असा संदेश दिला. १७ वयोगटातील मुलींच्या सीआरपीएफ नागपूर संघाने प्रथम स्थान प्राप्त केले. कुलाबाच्या संघाने द्वितीय तर व्हीआरडीई अहमदनगरच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.१४ वर्षे गटातील प्रथम क्रमांक ही सीआरपीएफ नागपूर केंद्रीय विद्यालयाच्या संघाने प्राप्त केला. व्हीएसएन नागपूर आणि व्हीआरडीए अहमदनगरच्या संघांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान पटकावले.14 वर्षाखालील मुलांच्या संघात पोंडा गोवा केंद्रीय विद्यालयाच्या संघांने प्रथम स्थान घेवून बाजी मारली तर नागपूर आणि तळेगावच्या सीआरपीएफ संघाने अनुक्रमे द्वितीय व तृतीय पारितोषिक प्राप्त केले.१७ वर्षे गटातील सामन्यात ही नागपूर सीआरपीएफच्या मुलांच्या संघाने उत्तम कामगिरी करीत प्रथम पारितोषिक पटकावले. कुलाबाच्या संघाला द्वितीय तर आयोजक नासिक रोड कॅम्प संघाला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. विजेत्या खेळाडूंना पदके व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धांचे मुख्य पंच म्हणून नाशिक जिल्हा हँडबॉल असोसिएशनचे सी. भाग्यवंत यांनी जबाबदारी पार पाडली. तसेच डॉ. लवनीत रंधावा, कल्पना शिंदे व अनिल कुमार चौधरी यांनी निर्णायक म्हणून काम पाहिले. बक्षीस वितरण समारंभाचे संचलन स्वाती सोनुले यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कल्पना शिंदे, शुभम यादव, अरविंद लोखंडे, अमीत कुमार शुक्ला, इकबाल पठाण, प्रवीण आराख, ओंकार काकुस्ते, समाधान पाटील, मनीषा विनीत, निमिषा, सुनील वाघ, नईम शेख, अमृत बागुल, आरीफ बेग, आविष्कार धिवरे आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.विजेत्या संघांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## जिंतूर तहसील मध्ये जनगणना प्रगनक व पर्यवेक्षकांची पहिले प्रशिक्षण शिबिर

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर भारत सरकारच्या निर्देशानुसार जिंतूर तहसील तर्फे तीन दिवसीय विशेष प्रगनक व पर्यवेक्षक यांची पहिली शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरासाठी जिंतूर तालुक्यातील ग्रामीण भागाचे चार्ज अधिकारी म्हणून तहसीलदार सौ.शितल कच्छवे ह्या काम पाहणार असून शहरी भागातील नगरपरिषद अंतर्गत ची जनगणना चार्ज ऑफिसर उमेश ढाकणे मुख्याधिकारी जिंतूर हे काम पाहणार असल्याचे तहसील कार्यालय तर्फे प्रसीध्द करण्यात आले आहे.या प्रशिक्षण मध्ये डिजिटल जनगणना असून प्रगणकांना HLO मोबाईल अँप आणि CMML पोर्टल वापराबाबत सविस्तर प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.त्याचबरोबर माहिती संकलन मध्ये घराची संख्या, कुटुंबाची माहिती, उपलब्ध सुविधा, स्थानिक पातळीवरील आवश्यक माहिती भरावी यांचे मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे ही म्हटले आहे.त्याचबरोबर नकाशे आणि तांत्रिक पैलू नजरी नकाशे तयार करणे व डेटा एन्ट्री च्या तांत्रिक प्रक्रियेची माहिती मास्टर ट्रेनर देणार असल्याचे म्हटले आहे.

पहिल्या टप्पा १ मे २०२६ पासून सुरू होणार असून नागरिकांनी अचूक माहिती देऊन जनगणना कार्यास सहकार्य करावे असे आव्हान प्रशासनांकडून करण्यात आले आहे. त्यानंतर १६ मे पासून घरोघरी प्रगणक येणार असून १४ जून पर्यंत पहिला टप्पा पूर्ण करावयाचा असल्याचे नमूद करण्यात आले आहे .स्वगणना ही पहिल्यांदाच स्वत:ला करावयाची संधी असून सामान्य नागरिकांनी १मे पासून १५ मे पर्यंत CMML पोर्टलवर स्वत:ची माहिती भरावयाची असून स्वगणना झाल्यावर संगणक घरोघरी जाऊन माहिती तपासून घेतील या कामी जिल्हा जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी कर्मचाऱ्यानी सर्व कर्मचाऱ्यांना काम राष्ट्रीय जबाबदारी असून पूर्ण निष्ठेने व वेळेत पूर्ण करण्याची आव्हानही केले असून प्रशिक्षणात या कामी उपस्थित न राहणाऱ्या कर्मचाऱ्यावर प्रशासकीय कार्यवाहीची संकेतही दिले आहेत.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक,
आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ एप्रिल २०२६

# बौद्धिक संपदा : नवसर्जनाचे संरक्षक छत्र

**द**रवर्षी २६ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक बौद्धिक संपदा दिन' म्हणून साजरा केला जातो आणि हा दिवस मानवी सर्जनशीलतेच्या सामर्थ्याचा, ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेचा आणि नवोन्मेषाच्या प्रवाहाचा उत्सव म्हणून ओळखला जातो. मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीचा मागोवा घेतला असता असे स्पष्टपणे दिसून येते की, मानवाने आपल्या बुद्धीच्या, कल्पनाशक्तीच्या आणि सर्जनशीलतेच्या बळावरच समाज, संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची उभारणी केली आहे. या सर्व प्रक्रियेतून निर्माण होणारी बौद्धिक संपदा ही केवळ एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नसून ती समाजाच्या प्रगतीची पायाभूत शक्ती आहे. त्यामुळे या संपदेचे संरक्षण, संवर्धन आणि योग्य व्यवस्थापन करणे ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची गरज ठरते.'बौद्धिक संपदा' ही संकल्पना मूलतः मानवी बुद्धिमत्तेने साकारलेल्या निर्मितींशी संबंधित आहे. साहित्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वैज्ञानिक संशोधन, तांत्रिक शोध, औद्योगिक डिझाईन्स, व्यापारचिन्हे, भौगोलिक संकेत अशा विविध स्वरूपांमध्ये बौद्धिक संपदेचे अस्तित्व आढळते. या सर्व निर्मितींमध्ये सर्जनशीलता, मौलिकता आणि नवोन्मेष यांचे दर्शन घडते. या निर्मितींचे कायदेशीर संरक्षण करण्यासाठी विविध प्रकारचे बौद्धिक संपदा हक्क अस्तित्वात आले आहेत. कॉपीराइट, पेटंट, ट्रेडमार्क, औद्योगिक डिझाईन, भौगोलिक संकेत हे त्यातील प्रमुख प्रकार होत. या हक्कांमुळे सर्जकाला त्याच्या निर्मितीवर विशिष्ट कालावधीसाठी मालकी हक्क प्राप्त होतो आणि त्यातून आर्थिक व सामाजिक लाभ मिळवण्याची संधी उपलब्ध होते.जागतिक बौद्धिक संपदा दिन साजरा करण्यामागील उद्दिष्ट केवळ या संकल्पनेची माहिती देणे एवढ्यावर मर्यादित नाही, तर सर्जनशीलतेचा सन्मान करणे, नवोन्मेषाला प्रोत्साहन देणे आणि निर्मात्यांच्या हक्कांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हेही त्यामागील महत्त्वाचे हेतू आहेत. या दिवसाच्या निमित्ताने विविध देशांमध्ये शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे, उद्योगसंस्था आणि शासन यांच्याद्वारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि सामान्य नागरिकांना बौद्धिक संपदेचे महत्त्व समजावून सांगितले जाते. विशेषतः तरुण पिढीमध्ये नवकल्पनांची प्रेरणा निर्माण करणे आणि त्यांना त्यांच्या कल्पनांचे संरक्षण करण्याबाबत मार्गदर्शन करणे ही या उपक्रमांची मुख्य उद्दिष्टे असतात.आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात बौद्धिक संपदेचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता, नॅनोतंत्रज्ञान अशा क्षेत्रांमध्ये सतत नवीन संशोधन होत आहे. या संशोधनातून निर्माण होणाऱ्या नवकल्पना आणि शोध यांचे संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची आवश्यकता अनिवार्य ठरते. एखाद्या संशोधकाने अथवा संस्थेने मोठ्या परिश्रमाने आणि गुंतवणुकीने तयार केलेल्या शोधाचे संरक्षण नसेल, तर त्या शोधाचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण होते आणि त्यामुळे संशोधनाची प्रेरणा कमी होऊ शकते. म्हणूनच बौद्धिक संपदा हक्क हे नवोन्मेषासाठी प्रोत्साहन देणारे महत्त्वाचे साधन मानले जाते.आर्थिक दृष्टीकोनातून पाहता, बौद्धिक संपदा ही आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. ज्ञानाधारित उद्योगांमध्ये बौद्धिक संपदेचे मूल्य प्रचंड असते. सॉफ्टवेअर उद्योग, मनोरंजन क्षेत्र, औषधनिर्मिती उद्योग, फॅशन उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये बौद्धिक संपदेचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या क्षेत्रांमध्ये निर्माण होणाऱ्या उत्पादनांचे आणि सेवांचे मूल्य त्यांच्या सर्जनशीलतेवर आणि नवोन्मेषावर अवलंबून असते. त्यामुळे या क्षेत्रांतील कंपन्या त्यांच्या बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात. यामुळे आर्थिक विकासाला गती मिळते आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळते.सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही बौद्धिक संपदेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक समाजाची एक वेगळी सांस्कृतिक ओळख असते आणि ही ओळख त्या समाजाच्या परंपरा, कला, साहित्य, लोकसंस्कृती यांमध्ये प्रतिबिंबित होते. या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे हे देखील बौद्धिक संपदा व्यवस्थेचे एक महत्त्वाचे कार्य आहे. विशेषतः भौगोलिक संकेतांच्या माध्यमातून एखाद्या विशिष्ट प्रदेशातील उत्पादनांची ओळख जपली जाते. उदाहरणार्थ, एखाद्या प्रदेशातील हस्तकला, खाद्यपदार्थ किंवा कृषी उत्पादने यांना त्यांच्या विशिष्ट वैशिष्ट्यांमुळे विशेष दर्जा प्राप्त होतो आणि त्याचे संरक्षण केले जाते. यामुळे त्या प्रदेशातील कारागीर, शेतकरी आणि उत्पादक यांना आर्थिक लाभ मिळतो आणि त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचे जतन होते.तथापि, बौद्धिक संपदा हक्कांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत. विशेषतः डिजिटल युगात माहितीचे आदानप्रदान अत्यंत सुलभ झाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून साहित्य, संगीत, चित्रपट, सॉफ्टवेअर यांची सहज देवाणघेवाण होत असल्यामुळे कॉपीराइट उल्लंघनाच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. पायरेटसी, नकली उत्पादने, ट्रेडमार्कचे उल्लंघन या समस्या आज जागतिक स्तरावर गंभीर बनल्या आहेत. या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायदे, प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती आवश्यक आहे.भारतातील संदर्भात बौद्धिक संपदेचे महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित होते. भारत हा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि विविधतेने नटलेला देश आहे. येथे प्राचीन काळापासून विविध प्रकारचे पारंपरिक ज्ञान आणि कौशल्य विकसित झाले आहे. आयुर्वेद, योग, पारंपरिक औषधपद्धती, हस्तकला, लोककला, कृषी पद्धती या क्षेत्रांमध्ये भारताची समृद्ध परंपरा आहे. या पारंपरिक ज्ञानाचे संरक्षण करणे आणि त्याचा योग्य उपयोग करणे ही आजची गरज आहे. भौगोलिक संकेतांच्या माध्यमातून या परंपरांचे संरक्षण केले जाऊ शकते आणि त्यातून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते.शैक्षणिक क्षेत्रात बौद्धिक संपदेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधन आणि विकास यांना प्रोत्साहन देण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि नवोन्मेषाची वृत्ती विकसित होते. तसेच, संशोधनातून निर्माण होणाऱ्या निष्कर्षांचे संरक्षण करून त्यांचा समाजहितासाठी उपयोग केला जाऊ शकतो. विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांच्यामार्फत पेटंट्स, कॉपीराइट्स आणि इतर बौद्धिक संपदा हक्क मिळवण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.नैतिक दृष्टिकोनातून पाहता, बौद्धिक संपदेचा आदर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. एखाद्या व्यक्तीच्या श्रमांचे आणि सर्जनशीलतेचे योग्य मूल्यांकन करणे हे सामाजिक न्यायाच्या तत्त्वाशी सुसंगत आहे. जेव्हा आपण इतरांच्या निर्मितीचा विनापरवानगी वापर करतो, तेव्हा आपण त्या व्यक्तीच्या अधिकारांचे उल्लंघन करतो. त्यामुळे बौद्धिक संपदेबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून ही जाणीव वाढवता येऊ शकते.डिजिटल युगात बौद्धिक संपदेच्या स्वरूपात मोठे बदल होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा यांसारख्या तंत्रज्ञानामुळे नवीन प्रकारच्या सर्जनशीलतेचा उदय होत आहे. या नव्या परिस्थितीत बौद्धिक संपदा हक्कांच्या व्याख्या आणि अंमलबजावणी यामध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, कृत्रिम बुद्धिमत्तेने निर्माण केलेल्या कलाकृतींचे हक्क कोणाला द्यायचे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात जागतिक स्तरावर चर्चा सुरू आहे.भारत सरकारने बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात विविध धोरणे आणि योजना राबविल्या आहेत. स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधनाला चालना देण्यासाठी आणि नवोन्मेषाला समर्थन देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. 'स्टार्टअप इंडिया', 'मेक इन इंडिया' यांसारख्या उपक्रमांमुळे तरुण उद्योजकांना संधी उपलब्ध होत आहे. यामुळे देशात नवकल्पनांचे वातावरण निर्माण होत आहे आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे.तथापि, बौद्धिक संपदा हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अजूनही अनेक पावले उचलण्याची आवश्यकता आहे. विशेषतः ग्रामीण भागात आणि लघुउद्योगांमध्ये या हक्कांबाबत जागरूकता कमी आहे. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये जनजागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच, न्यायालयीन प्रक्रिया सुलभ करणे, तक्रारींचे जलद निवारण करणे आणि तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणेही गरजेचे आहे.जागतिक बौद्धिक संपदा दिन हा सर्जनशीलतेचा, नवोन्मेषाचा आणि ज्ञानाचा उत्सव आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या समाजात बौद्धिक संपदेचा आदर करण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. सर्जकांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि नवकल्पनांना चालना देणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यामुळेच समाजाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.अखेर, बौद्धिक संपदा ही मानवाच्या प्रगतीचा मूलाधार आहे. तिचे संरक्षण आणि संवर्धन केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. त्यामुळे जागतिक बौद्धिक संपदा दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी सर्जनशीलतेचा सन्मान करण्याचा, नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचा आणि बौद्धिक संपदेच्या संरक्षणासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा संकल्प केला पाहिजे. हीच या दिवसाची खरी उपयुक्तता आणि महत्ता आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ एप्रिल २०२६


## शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल विठ्ठल अनमुलवाड यांना ग्लोबल स्टार टीचर अवॉर्ड




**छत्रपती संभाजीनगर :** अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा, पूर्णा येथील शिक्षक विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती व विद्यार्थीकेंद्रित शैक्षणिक कार्यासाठी ग्लोबल स्टार टीचर अवॉर्ड 2026 ने सन्मानित करण्यात आले.छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी सभागृहात आयोजित समारंभात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.या प्रसंगी डॉ. सुनील गायकवाड (माजी खासदार, लातूर), डॉ. मंगल पांचाळ (ज्येष्ठ साहित्यिका व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर), लीना पंडित (सुप्रसिद्ध अभिनेत्री), कृष्णकुमार दडके (संमेलनाध्यक्ष व समाजसेवक, परभणी), दिलीप घेवंदे (ज्येष्ठ अभिनेते व निर्माता) तसेच प्रा. डॉ. बी. एन. खरात (संचालक, समृद्धी पब्लिकेशन व किल्ले पर्यटन महोत्सव फाउंडेशन, महाराष्ट्र) यांची प्रमुख उपस्थिती होती.अनमुलवाड यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या उपक्रमांमुळे शिक्षणात नवे प्रयोगशील बदल घडवले असून, त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान देण्यात आला.

उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले.पुरस्कार स्वीकारताना विठ्ठल अनमुलवाड यांनी हा सन्मान आपल्या विद्यार्थ्यांना समर्पित करत भविष्यातही शिक्षण क्षेत्रात नवे उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## विद्यार्थ्यांसह पालकांनाही योग्य दिशा देते करिअर मार्गदर्शन - मा. नगराध्यक्ष कोल्हे




**कन्नड (अरुण थोरात) :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आणि ऊर्जा असते, मात्र योग्य मार्गदर्शनाअभावी ते मागे राहू शकतात. आजचा पालक आपल्या पाल्याच्या भविष्याबाबत चिंतेत आहे, अशा वेळी केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर पालकांनाही योग्य दिशा देण्याचे काम करिअर मार्गदर्शन करते, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे यांनी केले.कन्नड येथे आयोजित गाव ते ग्लोबल करिअर कॅम्प' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा स्वाती कोल्हे होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक राजीव जाधव यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमेरिकेतील 'व्हर्साटाईल सायंटिस्ट'चे डॉ. नामदेव तोगरे यांनी केले. "गावातील मुलांमध्ये टॅलेंटची कमी नाही. योग्य दिशा मिळाल्यास गावातील मुलगा देखील जागतिक (ग्लोबल) पातळीवर आपली चमक दाखवू शकतो, याच भूमिकेतून या कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.शनिवारी (दि. 25) झालेल्या पहिल्या सत्रात तज्ज्ञ वक्त्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले सचिन वारुळकर 'शिक्षण मुलाचं, शिकवण पालकाचं' या विषयावर संवाद साधला. मनोज यादव सोनकांबळे स्पर्धा परीक्षा तयारीबाबत सखोल मार्गदर्शन केले. तेजस धनवट स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC) परीक्षांच्या संधी उलगडून दाखवल्या. अनिकेत सनदे नर्सिंग क्षेत्रातील करिअरच्या वाटा सांगितल्या. मनीष मानकर कृषी क्षेत्रातील शिक्षण आणि भविष्यातील संधींवर व्याख्यान दिले. राजरतन हिवराळे जर्मनीतील मोफत शिक्षण आणि तेथील उज्वल करिअरबद्दल माहिती दिली.व्याख्यानानंतर विद्यार्थी आणि पालकांनी विचारलेल्या प्रश्नांना वक्त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.रविवार, दि. 26 रोजी देखील देश-विदेशातील नामांकित व्यक्ती विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. या संधीचा लाभ घेण्यासाठी परिसरातील विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किशोर क्षीरसागर, महेश सोनवणे, यादव बलुरे, प्रियंका भोज, योगेश साळुंखे, स्वाती महानंदा व व्हर्साटाईल सायंटिस्ट टीमच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल ढेपे यांनी केले, तर आभार संजय केवट यांनी मानले.





